# मेट्रो मार्गावर 'वननिर्मिती'

**म. टा. प्रतिनिधी**

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गावर ९ हजार झाडांचे रोपण करण्याचा निर्णय मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने घेतला आहे. यासाठी कॉर्पोरेशन आणि फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र (एफडीसीएम) यांच्यात करार झाला. पर्यायी वृक्षारोपण अंतर्गत मियावाकी पद्धतीने हे वृक्षारोपण करण्यात येणार असल्याचे मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून स्पष्ट करण्यात आले.



'इन-ऑर्बिट मॉलजवळ सुमारे ३००० चौ. मी. भूखंडावर ९००० झाडांचे मियावाकी पद्धतीने रोपण केले जाणार आहे. वृक्षारोपण मोहिमेअंतर्गत एफडीसीएमच्या मदतीने अत्यल्प कालावधीत ही घनदाट वननिर्मिती केली जाणार आहे. पर्यावरण संरक्षणासाठी आमच्या हरित धोरणानुसार ही मोहीम राबविण्यात येत आहे', असे मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजीत सिंह देओल यांनी सांगितले. तीन महिन्यांच्या कालावधीत विविध स्थानिक प्रजाती जसे काथ, कडुलिंब, आवळा, बकुळ, सीता अशोक, चिंच, अर्जुन, बदाम इत्यादी ९ हजार वृक्षांचे रोपण येथे करण्यात येणार आहे. एफडीसीएम पुढील दोन वर्षे या झाडांची निगा राखील. या कराराप्रसंगी एफडीसीएम नाशिक विभागाचे प्रादेशिक व्यवस्थापक, पी. टी. मोराणकर, मेट्रो कॉर्पोरेशनचे कार्यकारी संचालक (नियोजन) आर. रमणा हे उपस्थित होते.